# काँग्रेस- पैसा झाला छोटा

-मानसी मोकाशी

भाजपाच्या नेतृत्वाखालील मोदी सरकारची चार वर्षं पूर्ण होताना सर्वच राजकीय पक्षांना पुढच्या वर्षी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीचे जोरदार वेध लागले आहेत. कोण कोणाबरोबर युती करेल, कोण कोणाविरुद्ध लढेल याची गणितं शेवटपर्यंत सोडवली जातील. त्यातील महत्त्वाचा हातचा आहे पक्षांचं अर्थकारण. निवडणुकीसाठी कितीही नियम केले, तरी त्यातले किती पाळले जातात ते आपण सर्वजण पाहातोच. सैन्य पोटावर चालतं असं म्हणतात. त्याप्रमाणे राजकीय पक्ष हे पैशावर- त्यांना मिळणाऱ्या निधीवर चालतात. लोकशाहीतील निवडणुकांसाठी अमाप पैसा लागतो. २०१४ सालच्या सार्वत्रिक निवडणुकांत ५ अब्ज डॉलर खर्च केले गेले असा अंदाज आहे. हे पैसे येतात कुठून? ते देतं कोण आणि कशासाठी?

या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर 'लोकशाही पुनर्स्थापित करण्यासाठी कॉंग्रेसला निधी द्या,' अशा काँग्रेसनं ट्विटरवर केलेल्या आवाहनाचा विचार करावा लागतो. स्वातंत्र्यानंतरच्या ७१ वर्षांपैकी ४९ वर्षं म्हणजे जवळपास अर्धशतक हा पक्ष देशात सत्ताधारी आहे. देशातील १३३ वर्षांच्या, म्हणजे सर्वात जुन्या पक्षाला असं आवाहन करण्याची वेळ येते त्याला कारणं काय आहेत? निवडणुकीसाठी सरकारनं पैसा खर्च करावा म्हणजे भ्रष्टाचाराला जागा राहणार नाही असा एक युक्तिवाद केला गेला. पण प्रत्यक्षात तसं काहीही होऊ शकलं नाही. ज्या पक्षाला निवडणूक लढवायची असते, त्याला किंवा त्याच्या उमेदवाराला त्यासाठी पैसा खर्च करावा लागतो. राज्य पातळीवरील निवडणुकीचा विचार केला तरी विधानसभेसाठी १४ लाख डॉलर खर्च होतो असा अंदाज आहे. निवडणूक आयोगानं त्या खर्चावर निर्बंध घातलेले आहेत.त्यामुळे प्रत्यक्ष दाखवलेला खर्च हा त्यापेक्षा कमी असतो. निवडणुकीसाठी उमेदवार निवडताना त्याची किती खर्चाची तयारी आहे याचा विचार होतो तो त्यामुळेच.

निवडणुकीसाठी इतका पैसा लागतो कशासाठी? निवडणुकीसाठी उमेदवार निवड प्रक्रियेपासून खर्चाची सुरुवात होते. निवडणुकीच्या प्रचार सभा, उमेदवारांचे दौरे, प्रचार साहित्य वगैरेसाठी पैसा लागतो. आता समाजमाध्यमांच्या वापरामुळे कदाचित येत्या निवडणुकीत त्यात काही प्रमाणात घट होईल. या उघड खर्चाशिवाय एका प्रथितयश ज्येष्ठ पत्रकाराला एका माजी खासदारानं सांगितल्याप्रमाणे घडत असेल तर या खर्चाच्या निम्मा पैसा तर निवडणुकीच्या दिवशी लागतो. कसा? दिवसाच्या निम्म्या मतदानानंतर काही मंडळी नेत्यांकडे येतात आणि आम्ही मतदान केलेलं नाही म्हणून निवडणूक शाई नसलेली बोटं दाखवतात. हल्ली हे काम समाजमाध्यमांद्वारे केलं जातं. निवडणूकीची शाई न लावलेली बोटं छायाचित्रांद्वारे उमेदवाराला दाखविली जातात. त्यांना मतपेटीपर्यंत नेण्यासाठी पैसा लागतो. हरलेला उमेदवार पुन्हा उभा राहण्याचा प्रयत्न कमी करतो हे कदाचित त्याचं कारण असू शकतं. अलिकडे निवडणुकीआधी आणि निवडणुकीदरम्यानच्या काळात गाड्या भरून पैसे जप्त केले गेले त्यामुळेच.

संयुक्त पुरोगामी आघाडीतील अनेक मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप होते. त्यानंतर २०१४ साली त्यांच्या आघाडीला पायउतार व्हावे लागले. सामान्य माणूस मत देतो. काही पक्षांच्या आवाहनानंतर मतदारांनीही पक्षाला पैसे दिल्याची तुरळक उदाहरणं आहेत. पण मुख्यतः पैसे देतात त्या कॉर्पोरेट कंपन्या. त्या नेहमी सत्ताधाऱ्यांमागेच उभ्या राहतात. त्यामुळे गेल्या वर्षी भाजपाने अशा निवडणूक निधीतून १० अब्ज रु. मिळवले. मागच्या वर्षाच्या ८० टक्के अधिक हा आकडा आहे. आता केंद्रात आणि २२ राज्यांत सत्ता भाजपाची आहे. काँग्रेसला सव्वादोन अब्ज रु मिळाले. मागच्यापेक्षा ते १४ टक्के कमी आहेत. कारण उघड आहे. पाच वर्षांपूर्वी काँग्रेस केंद्रात आणि १५ राज्यात सत्तेत होती. आता ती केंद्रात तर सत्तेत नाहीच, दोन मोठी राज्यं वगळता काँग्रेसची कुठेही सत्ता नाही. देश पातळीवरील खासदारांचा विचार करता ५४३ पैकी आजघडीला फक्त ४४ खासदार काँग्रेसचे आहेत. त्यामुळे जसजशी निवडणूक जवळ येईल तसतशी निधीची चणचण काँग्रेसला आणि इतरही पक्षांना जाणवेल अशी शक्यता आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या आगामी बैठकीच्या निमित्ताने त्यांनीही कार्यकर्त्यांना केलेले आवाहन लक्षात घेण्यासारखे आहे. बऱ्याच प्रमाणात तुमची तुम्ही सोय बघा. पक्ष आता पूर्वीप्रमाणे खर्च करू शकत नाही असे निवेदन वाचण्यात आले. पूर्वी हाही पक्ष महाराष्ट्रात सत्तेत होता आणि

पुणे, पिंपरी, चिंचवड येथील श्रीमंत महानगरपालिका त्यांच्या ताब्यात होती. त्यावेळी या पक्षाचे शाही अधिवेशन होत असे. त्या पार्श्वभूमीवर हा बदल जाणवणारा आहे. राष्ट्रीय काँग्रेस हा निदान एकेकाळी तरी देशभर सत्ताधारी पक्ष होता. पण राष्ट्रवादी काँग्रेस हा राष्ट्रीय काँग्रेसमधून फुटून बाहेर पडलेला पक्ष आहे. तो राष्ट्रीय पक्ष असल्याचा दावा करीत असला तरी त्याला महाराष्ट्राबाहेर फारसा जनाधार नाही. महाराष्ट्रातही विशेषतः साखर पट्ट्यात या पक्षाचा बोलबाला आहे. साखरेचे कमी होत असलेले दर आणि सध्याच्या आतबट्ट्याच्या साखर कारखानदारीमुळे तिकडूनही या पक्षाला आर्थिक आधार फारसा नाही. त्यामुळेही त्यांना आता काटकसरीची वेळ आली असावी. बहुतेक जिल्ह्यांतील राज्य सहकारी बँका या पक्षाच्या अखत्यारीत आहेत. पण यातील बहुतेक बँका खिळखिळ्या झालेल्या आहेत. या पक्षाचे नेते जेव्हा शेतकऱ्यांना किंवा इतर कर्जदारांना कर्जे भरू नका म्हणतात, तेव्हा तो मुद्दा त्यांच्यावरच बुमरँग होतो. बहुतेक बँकांच्या संचालकांनी तीच री ओढून कर्जे घेतलेली आहेत आणि आता त्यांचे साखर कारखाने विकण्याची पाळी आली आहे. तरी ती कर्जे वसूल होतील की नाही हा प्रश्नच आहे.

राजकीय पक्षांना मिळणाऱ्या देणग्या मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांबरोबरच इतरही सामान्य, लहान देणगीदारांकडूनही मिळतात. हे पक्ष कुपनं विकून हे पैसै उभे करतात. देणगी २० हजार रुपयांवरील असेल तरच त्याची पावती दिली जाते. त्याहून लहान देणग्यांचा हिशोब मिळणं दुरापास्त असतं. इथेच काळा पैसा वापरला जातो असं जाणकार निरीक्षक सांगतात. राजकीय पक्षांसाठी सरकारनं इलेक्टोरल बाँडस्ही काढले आहेत. पण तेही मोठ्या रकमेचे असतात. यामध्ये दात्याचं नांव जाहीर करणं बंधनकारक नाही. त्यामुळे या सर्व निधीमध्ये पारदर्शकता कशी येईल हा खरा प्रश्न आहे.

मग भारतीय राष्ट्रीय काँग्रेसनं पारदर्शकता दाखविण्यासाठी निधीसाठी आवाहन केलं आहे का ? इतका निधी आम्हाला जनतेनं प्रेमानं दिला असं दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे का? तसं असू शकेल. पण काँग्रेसला पैशाची चणचण भासू लागली आहे हे मात्र नक्की. इतर राज्यांत कार्यालयीन कामकाजासाठी पैसे पाठवणं त्यांनी बंद केलं आहे. त्रिपुरा, नागालँड,

मिझोराममधील निवडणुकांच्या वेळी त्या निवडणुकावर लक्ष ठेवण्यासाठी कुमक पाठवली गेली नाही. यालाही आर्थिक चणचण हे कारण असल्याचं सांगितलं जातं.

काही आठवड्यांपूर्वी एटीएम कोरडे झाल्याची घटना झाली आणि केंद्रावर प्रश्नांची सरबत्ती झाली. त्यांना  कारभार करता येत नाही अशीही टीका करण्यात आली. निवडणुकांत पैसै हाताशी असावेत म्हणून तर हे एटीएम नाट्य घडवलं गेलं नव्हतं ना? नोव्हेंबर २०१६ मध्ये पंतप्रधान मोदींनी अचानक नोटाबंदी जाहीर केली. खात्यात पैसे आहेत, पण खिशात पैसे नाहीत अशी परिस्थिती बहुतेकांची झाली. एटीएमवर लांबच लांब रांगा लागल्या. विरोधी पक्षांनी या निर्णयाला तीव्र विरोध केला. नोटाबंदी निष्फळ झाली अशी चर्चा आजतागायत चालू आहे. त्यावेळी सामान्य माणूस मात्र हा काळ्या पैशाविरोधात घेतलेला निर्णय आहे म्हणून स्वतः हाल सोसायला आनंदानं तयार झाला. देशात काळ्या पैशाची समांतर अर्थव्यवस्था आहे हो उघड गुपित आहे. लोकशाहीच्या नावाखाली नेत्यांनी आपलं घरं भरली याची माहिती सामान्य माणसालाही आहे. भ्रष्टाचाराचा हा गोरखधंदा थांबवायला पंतप्रधानांनी हा निर्णय घेतला याबद्दल सामान्य माणूस खूषच होता. या निर्णयाचा आर्थिक फटकाही काही व्यवसायांना बसला, पण त्याचवेळी नदीत तरंगणाऱ्या हजारोंच्या नोटा, रस्त्यावर अनामिकांनी केलेला नोटांचा वर्षाव अशा सुरस आणि चमत्कारिक कथाही आपण वाचल्या. काही महाभाग आपल्या मोठ्या नोटा बदलून घेण्यात यशस्वी झाले हे खरं आहे, पण काही प्रमाणात तरी या काळ्या पैशाला वेसण बसली असावी. त्याचा परिणाम म्हणून ही राजकीय पक्षांना जाणवणारी आर्थिक चणचण नाही ना?

काही वर्षांपूर्वी काँग्रेस विरुद्ध सर्व पक्ष असं चित्र देशात होतं. आता भाजपा विरोधात एकी करण्याचे प्रयत्न होत आहेत. ते किती यशस्वी होतील ते येणारा काळच ठरवील. पण या सगळ्या कडबोळ्याला एकत्र आणणारं गाजर हे सत्तेचं आहे. त्याचबरोबर काँग्रेसबरोबरच येणाऱ्या बहुतेक पक्षांचं अस्तित्व राज्यपातळीवरचंच आहे. राष्ट्रीय पातळीवर अस्तित्व असलेल्या काँग्रेसची धुरा राहुल गांधींकडे आली असली तरी सध्याचा काळ त्या पक्षाला कठीण आहे. सर्व पक्षांची वज्रमूठ बांधण्याची ताकद त्यांच्यात आहे का याबद्दल  राजकीय वर्तुळात शंका व्यक्त केली जाते. खिळखिळा पक्ष आज त्यांच्या मदतीला किती येईल, याबद्दल लोकांच्या मनात

शंका आहे, त्यामुळेही काँग्रेसची गंगाजळी आटत चाललेली दिसते. स्वातंत्र्यपूर्व काळात व त्यानंतरही काही काळ निःस्वार्थ देशभक्तांचा पक्ष अशी काँग्रेसची प्रतिमा होती. ती आता तशी राहिलेली नाही. भाजपाच्या भात्यात मात्र रा स्व संघासारखी आदेशावर काहीही करायला तयार असलेली फौज आहे. रा स्व संघाकडे ५० लक्ष कार्यकर्ते आहेत असं म्हटलं जातं. तेही भाजपाचं बलस्थान आहे.

आजतरी विरोधी पक्ष आणि विशेषतः काँग्रेस सत्ता नाही म्हणून पैसा नाही आणि पैसा नाही म्हणून सत्ता नाही अशा दुष्टचक्रात अडकली आहे.

**-मानसी मोकाशी**


मानसी मोकाशी

१०१ साईसुगंध, ए विंग,

१४० अ रेल्वे लाईन्स,

सोलापूर ४१३००१